# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.१६५१/२०२२/जळगांव मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.दिलीप तुकाराम निकम, रा.लक्ष्मीछाया अपार्टमेन्ट, फ्लॅट नं.११, शिवाजी चौक, पाथरवट लेन, पंचवटी, नाशिक ४२२ ००३. | सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव ता.जि.जळगांव. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव. ता.जि.जळगांव. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिल संदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये पंचायत समिती ता.चाळीसगांव जि.जळगांव येथील दि.१०/१०/२०११ ते दि.१५/१०/२०२१ पर्यंत मा.जन माहिती अधिकारी व मा.प्रथम अपिलीय अधिकारी या पदावर काम करणा-या अधिका-यांची संपूर्ण नावे, निवासाचा संपूर्ण पत्ता, कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, हुद्दा याची सविस्तर यादी तक्ता स्वरुपात मला मा.उच्च न्यायालय मुंबई येथे कामकाजास्तव तात्काळ देण्यात यावी अशी मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २/०६/२०२२ रोजी सुनावणीअंती खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आंत अपिलार्थीस त्यांच्या दि.१८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आंतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन माहिती विनामूल्य व्यक्तीश: पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.२२२/१५/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहे की, याप्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपिल सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

२. सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांनी आयोगाकडे दि.१४/११/२०२२ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी श्री.दिलीप तुकाराम निकम यांनी दि.१८/१०/२०२१ रोजी या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) प्रमाणे माहिती मिळणेसंदर्भात अर्ज सादर केला होता. सदर अर्जात अर्जदार यांनी दि.१०/१०/२०२१ ते दि.२५/१०/२०२१ या कालावधीत पंचायत समिती चाळीसगांव विभागात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी या पदावर काम करणा-या अधिका-यांची संपूर्ण नावे, निवासाचा संपूर्ण पत्ता,

हुद्दा याची सविस्तर यादी तक्ता स्वरुपात मिळण्याची माहितीची मागणी केलेली होती. अर्जदार यांनी मागणी केलेली व या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगांव यांनी पुरविलेली असून सदर माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने दि.०८/११/२०२१ रोजी अपिलार्थी यांनी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगाव या कार्यालयाकडे प्रथम अपिल अर्ज दाखल केला. सदर प्रथम अपिलाची सुनावणी दि.२६/११/२०२१ व दि.२३/१२/२०२१ रोजी घेण्यात आली होती. सुनावणी दरम्यान अपिलार्थी गैरहजर होते. तसेच त्यांनी मागणी केलेली माहिती यापूर्वीच जा.क्र.साप्रवि/मा.अ./आरआर/५२९/२०२१ दि.२६/१०/२०२१ रोजी रजिस्टर पोस्टाने पुरविलेली असल्याने सदर प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात येऊन आदेश पारित करण्यात आलेला आहे. व सदर निर्णयाने आपले समाधान न झाल्यास म.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नाशिक यांचेकडे द्वितीय अपिल दाखल करु शकता असे कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दि.२३/०३/२०२२ रोजी आपलेकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे व सदर द्वितीय अपिलाची सुनावणी दि.२२/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यानुषंगाने सदर आदेशात निर्देशित केलेल्या मुद्दा क्र.२ अन्वये माझी प्रकृती अस्वस्थ असल्याने मला दि.२२/०६/२०२२ रोजी सुनावणीकरिता उपस्थित राहता आले नाही. तशी पूर्व परवानगी घेऊन तसा खुलासा दि.२२/०६/२०२२ अन्वये कळविलेले असून ई-मेल द्वारे माहिती सादर करण्यात आलेली आहे. तरी वरीलप्रमाणे माझा खुलासा मान्य होऊन स्विकृत व्हावा ही नम्र विनंती.

तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद जळगांव यांनी आयोगाकडे दि.१४/११/२०२२ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी श्री.दिलीप तुकाराम निकम यांनी दि.१८/१०/२०२१ रोजी या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) प्रमाणे माहिती मिळणेसंदर्भात अर्ज सादर केला होता. सदर अर्जात अर्जदार यांनी दि.१०/१०/२०२१ ते दि.२५/१०/२०२१ या कालावधीत पंचायत समिती चाळीसगांव विभागात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी या पदावर काम करणा-या अधिका-यांची संपूर्ण नावे, निवासाचा संपूर्ण पत्ता, हुद्दा याची सविस्तर यादी तक्ता स्वरुपात मिळण्याची माहितीची मागणी केलेली होती. अर्जदार यांनी मागणी केलेली व या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगांव यांनी पुरविलेली असून सदर माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने दि.०८/११/२०२१ रोजी अपिलार्थी यांनी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगाव या कार्यालयाकडे प्रथम अपिल अर्ज दाखल केला. सदर प्रथम अपिलाची सुनावणी दि.२६/११/२०२१ व दि.२३/१२/२०२१ रोजी घेण्यात आली होती. सुनावणी दरम्यान अपिलार्थी गैरहजर होते. तसेच त्यांनी मागणी केलेली माहिती यापूर्वीच जा.क्र.साप्रवि/मा.अ./आरआर/५२९/२०२१ दि.२६/१०/२०२१ रोजी रजिस्टर पोस्टाने पुरविलेली असल्याने सदर प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात येऊन आदेश पारित करण्यात आलेला आहे. व सदर निर्णयाने आपले समाधान न झाल्यास म.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नाशिक यांचेकडे द्वितीय अपिल दाखल करु शकता असे कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दि.२३/०३/२०२२ रोजी आपलेकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे व सदर द्वितीय अपिलाची सुनावणी दि.२२/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. तसेच माझे यशदा पुणे येथे दि.१३/०६/२०२२ ते दि.२४/०६/२०२२ अखेर प्रशिक्षण असल्याने सुनावणीकरिता उपस्थित राहता आले नाही. सदर कालावधीत म.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं.विभाग, जि.प.जळगांव यांचेकडे सामान्य प्रशासन विभागाचा कार्यभार देण्यात आलेला होता. तसेच त्यांनाही कोरोनाची बाधा झालेमुळे तेही सुनावणीकरिता उपस्थित राहिले नाही तसे दि.२२/०६/२०२२ अन्वये कळविलेले असून ई-मेल द्वारे माहिती सादर करण्यात आलेली आहे. तरी वरीलप्रमाणे अहवाल मान्य होऊन दि.०१/१२/२०१५ चे परिपत्रकानुसार कारवाई करण्यात येऊ नये ही नम्र विनंती.

तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद जळगांव यांनी आयोगाकडे दि.१४/११/२०२२ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी श्री.दिलीप तुकाराम निकम यांनी दि.१८/१०/२०२१ रोजी या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) प्रमाणे माहिती मिळणेसंदर्भात अर्ज सादर केला होता. सदर अर्जात अर्जदार यांनी दि.१०/१०/२०२१ ते दि.२५/१०/२०२१ या कालावधीत पंचायत समिती चाळीसगांव विभागात जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी या पदावर काम करणा-या अधिका-यांची संपूर्ण नावे, निवासाचा संपूर्ण पत्ता, हुद्दा याची सविस्तर यादी तक्ता स्वरुपात मिळण्याची माहितीची मागणी केलेली होती. अर्जदार यांनी मागणी केलेली व या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगांव यांनी पुरविलेली असून सदर माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने दि.०८/११/२०२१ रोजी अपिलार्थी यांनी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगाव या कार्यालयाकडे प्रथम अपिल अर्ज दाखल केला. सदर प्रथम अपिलाची सुनावणी दि.२६/११/२०२१ व दि.२३/१२/२०२१ रोजी घेण्यात आली होती. सुनावणी दरम्यान अपिलार्थी गैरहजर होते. तसेच त्यांनी मागणी केलेली माहिती यापूर्वीच जा.क्र.साप्रवि/मा.अ./आरआर/५२९/२०२१ दि.२६/१०/२०२१ रोजी रजिस्टर पोस्टाने पुरविलेली असल्याने सदर प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात येऊन आदेश पारित करण्यात आलेला आहे. व सदर निर्णयाने आपले समाधान न झाल्यास म.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नाशिक यांचेकडे द्वितीय अपिल दाखल करु शकता असे कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दि.२३/०३/२०२२ रोजी आपलेकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे व सदर द्वितीय अपिलाची सुनावणी दि.२२/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर कालावधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जि.प.जळगांव हे यशदा पुणे येथे प्रशिक्षणासाठी असल्याने माझ्याकडे दि.१३/०६/२०२२ ते दि.२४/०६/२०२२ अखेर तात्पुरते स्वरुपात सामान्य प्रशासन विभागाचा पदभार होता व मी स्वत: कोरोनाची बाधा झालेमुळे मी दि.२०/०६/२०२२ पासून होमक्वारंटाईन होतो. त्यामुळे सदर सुनावणीस उपस्थित राहू शकलो नाही. तसे दि.२२/०६/२०२२ अन्वये कळविलेले असून ई-मेल द्वारे माहिती सादर करण्यात आलेली आहे. तरी वरीलप्रमाणे अहवाल मान्य होऊन दि.०१/१२/२०१५ चे परिपत्रकानुसार कारवाई करण्यात येऊ नये ही नम्र विनंती. खुलासा मान्य होणेस विनंती असे.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव श्री.चंद्रकांत सदाशिव चौधरी तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद जळगांव श्रीमती स्नेहा कुडचे आणि विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद जळगांव श्री.अनिकेत पाटील यांनी आयोगाकडे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपिल सुनावणीवेळी अनुपस्थित राहिल्याबाबत जे लेखी खुलासे सादर केलेले आहेत त्याबाबत आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.२२२/१५/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार अनुपस्थितीबाबत कार्यवाही करण्याचे आदेशित केलेले असल्यामुळे आयोगाकडून यासंदर्भात पुन्हा आदेश पारित करणे अपेक्षित नाही.

४. आयोगाने सदर द्वितीय अपिल प्रकरणी पारित केलेल्या निर्णयात असे स्पष्ट नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी पंचायत समिती चाळीसगांव येथील माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी यांनी जळगांव विभागाची माहिती पुरविली आहे. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती पुरविणे आवश्यक होते परंतू तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद जळगांव श्री.चंद्रकांत सदाशिव चौधरी यांनी आयोगाकडे दि.१४/११/२०२२ अन्वये सादर केलेला लेखी खुलासा

समर्थनीय नसल्यामुळे अमान्य करण्यात येत आहे. म्हणून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव श्री.चंद्रकांत सदाशिव चौधरी यांनी आयोगाकडे सादर केलेला लेखी खुलासा अमान्य करण्यात येत असून उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या मते त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी त्यांच्या वेतनातून (सेवानिवृत्त झालेले असल्यास त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून) समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१६५१/२०२२/जळगांव अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**( भूपेन्द्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :- २८/०८/२०२४

---

प्रत :- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव ता.जि.जळगांव.

---

जावक क्र. ६५७४ दिनांक :- 28 AUG 2025